**ठळक बातम्या**

- भारत-युनायटेड किंगडम मुक्त व्यापार करार लागू /या कराराअंतर्गत निर्यातीसाठी मालाची पहिली खेप न्हावाशेवा बंदरातून रवाना

- देशात सेमीकंडक्टर निर्मितीसाठी उपयुक्त सेमीकॉन टू पॉईंट झिरो योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- महाराष्ट्रात शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांच्या वीज बिलाची थकबाकी माफ करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- नवी मुंबई विमानतळावरुन आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरु

**आणि**

- अंडर-नाईटिन आणि अंडर-ट्वेन्टीथ्री आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताची आज ३ सुवर्ण आणि १० रौप्य पदकांची कमाई

**<><><><><>**

भारत- युनायटेड किंगडम यांच्यातला मुक्त व्यापार करार आजपासून लागू झाला. या कराराअंतर्गत निर्यातीसाठी मालाची पहिली खेप आज मुंबईजवळच्या न्हावाशेवा बंदरातून रवाना झाली. याबाबत अधिक माहिती जाणून घेउया आमच्या प्रतिनिधीकडून

- - - **होल्ड- व्हॉईस कास्ट (प्रज्ञा) - - -**

*(भारत-युनायटेड किंगडम मुक्त व्यापार करारामुळे, भारतातून यूकेमध्ये होणाऱ्या ९९ टक्के निर्यातीवर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही. मुंबईत या कराराच्या अंतर्गत आयात-निर्यात सुरू करण्याच्या औपचारिक कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले, की भारतातल्या नव्या निर्यात क्रांतीचं नेतृत्व करायला, भारत आणि युके यांच्यातल्या सर्वंकष व्यापार करारामुळे निर्माण होणाऱ्या नव्या संधींचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्र तयार आहे. या करारामुळे राज्यात नवे उद्योग, गुंतवणूक सुरू होईल आणि राज्यातल्या जनतेसाठी नव्या संधी निर्माण होतील, असं ते म्हणाले. उद्योग आणि निर्यातीसाठी पोषक वातावरण तयार करण्यासाठी राज्य सरकार वचनबद्ध आहे याचा*

*पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला. राज्यातल्या आणि देशातल्या व्यावसायिकांसाठी या कराराचे फायदे समजावून देण्यासाठी प्रयत्न करण्याचं आश्वासन ब्रिटनचे मुंबईतले उप उच्चायुक्त हरजिंदर कांग यांनी यावेळी दिलं.*

*या कराराअंतर्गत निर्यातीसाठी मालाची पहिली खेप आज मुंबईजवळच्या न्हावाशेवा बंदरातून रवाना झाली. रसायनं, औषध निर्माण सामग्री, प्लास्टिक, खाद्यपदार्थ, एन्झाइम्स आणि मसाले अशा प्रकारच्या ७ निर्यातदारांचा माल त्यातून पाठवण्यात आला.)*

पश्चिम बंगालमध्ये कोलकाता इथं नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन या कराराअंतर्गत युकेमधे रत्नं आणि आभूषणांच्या निर्यातीची पहिली फेरी आज समारंभपूर्वक रवाना झाली.

**<><><><><>**

भारत-यूके संबंधांमधला हा नवा अध्याय सामायिक समृद्धी, नाविन्य आणि शाश्वत आर्थिक विकासाला हातभार लावेल, तसंच दोन्ही देशांमधल्या मैत्रीचे बंध अधिक दृढ करेल, असा विश्वास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

भारत- युनायटेड किंगडम यांच्यातल्या मुक्त व्यापार कराराचं अनेक स्तरावर स्वागत होत आहे. या करारामुळे दोन्ही देशांच्या सामायिक उद्दिष्टांचं रुपांतर प्रत्यक्ष संधींमध्ये होणार आहे, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा, उद्योग मंत्री पीयूष गोयल, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी, तसंच  देशातल्या उद्योग संघटनांनी या कराराचं स्वागत केलं आहे.

हा करार जागतिक पुरवठा साखळीत भारताचा सहभाग वाढवण्यासाठी आणि नवोन्मेषावर आधारित विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास फिक्कीचे सरचिटणीस अनंत स्वरूप यांनी व्यक्त केला. या करारामुळे वस्त्रोद्योग, चर्मोद्योग, सागरी उत्पादनं, रत्नं आणि दागिने, अभियांत्रिकी वस्तू आणि रसायनं यांसारख्या भारतीय क्षेत्रांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा असोचॅम चे अध्यक्ष निर्मल कुमार मिंडा यांनी व्यक्त केली आहे. तर या करारामुळे भारतीय निर्यातदारांना यूकेच्या बाजारपेठेत संधी तसंच समान स्पर्धात्मक वातावरण मिळेल, अशी प्रतिक्रिया ट्रेड प्रमोशन कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मोहित सिंगला यांनी दिली आहे.

**<><><><><>**

देशात सेमीकंडक्टर निर्मितीसाठी उपयुक्त सेमीकॉन टू पॉईंट झिरो योजनेला आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या योजनेसाठी १ लाख २७ हजार ५०० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद असेल. सेमीकॉन वन पॉईंट झिरो या योजनेचं हे पुढचं पाऊल असून महत्त्वाच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाला प्राधान्य देण्यासाठी, तसंच आर्थिक विकास आणि पुरवठा साखळीला मजबुती देण्यासाठी आवश्यक आरेखन, यंत्रसामुग्री, आस्थापना, आणि संशोधनावर या टप्प्यात भर दिला जाईल, असं ते म्हणाले. मोबाईल फोन उत्पादनासाठीच्या योजनेकरता ६२ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. या योजनेद्वारे पुढच्या ५ वर्षात मोबाईन फोन निर्मिती करता सव्वादोन ते ५ टक्केपर्यंत अर्थसहाय्य मिळेल. वैष्णव यांनी सांगितलं....

- **- होल्ड- बाईट- अश्विनी वैष्णव मोबाईल फोन निर्मिती- -**

युरिया उत्पादनात अधिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी राष्ट्रीय धोरणाला आजच्या बैठकीत मंजुरी मिळाली. नवीन धोरणानुसार युरियातल्या गुंतवणुकीवर १२ ते १५ टक्के दरानं परतावा मिळेल.

याखेरीज ओदिशा आणि झारखंडमधल्या १४५ किलोमीटर रेल्वेमार्गाचं बहुपदरीकरण, उत्तरप्रदेशात ६ पदरी ग्रीनफील्ड उन्नत मार्ग, पादचारी पूल, तसंच वरुणा नदीकिनाऱ्यावर उन्नतमार्गांच्या बांधकामाच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात साडे सात अश्वशक्तीपर्यंत क्षमतेच्या कृषी पंप जोडण्या असलेल्या शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांच्या वीज बिलाची थकबाकी माफ करण्याची घोषणा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली. मुंबई इथं शेतकऱ्यांनी आयोजित केलेल्या कृतज्ञता सोहळ्यात ते बोलत होते....

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री**

राज्याच्या सौर ऊर्जा उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना दिवसा ८ ते १२ तास मोफत वीज मिळेल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. राज्यात २४ नवी धरणं बांधण्यात येणार असून १६ जुन्या धरणांची उंची वाढवली जाईल. विदर्भात एकही जिल्हा दुष्काळी राहू नये यासाठी याचवर्षी हे काम पूर्ण करण्याकरता वेगवान प्रयत्न सुरू आहेत, असे ते म्हणाले.

**<><><><><>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिली आंतरराष्ट्रीय विमान सेवा आजपासून यशस्वीपणे सुरू झाली. या विमानतळावरून एअर इंडिया एक्स्प्रेसचं बोईंग ७३७ मॅक्स ८ हे अत्याधुनिक  विमान आज पहाटे अबू धाबीसाठी रवाना झालं. सुमारे शंभर प्रवासी असलेलं हे विमान अडीच तासांचा प्रवास करून सुरक्षितपणे उतरलं. नवी मुंबई विमानतळावरून पहिल्यांदाच नाशवंत वस्तूंची निर्यातही या विमानातून करण्यात आली. आठवड्यातून तीन वेळा विमान सेवा चालणार आहे.

**<><><><><>**

जकार्ता इथं सुरू असलेल्या अंडर-नाईटिन आणि अंडर-ट्वेन्टीथ्री आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी आज शानदार कामगिरी करत ३ सुवर्ण आणि १० रौप्य पदकांची कमाई केली. अंडर-नाईन्टिन गटात ५१ किलो वजनी गटात भारताच्या चंद्रीका पुजारीनं प्रतिस्पर्धी खेळाडूचा ५-० तर ५७ किलो वजनी गटात प्राचीनंही प्रतिस्पर्धी खेळाडूवर ५-० अशी मात करत दुसरं सुवर्णपदक मिळवलं. याच गटात गुंजन, जॉयश्री, चाहत, अंशिका, मेघा श्योकंद आणि प्राची तोकस यांना रौप्य पदकं मिळाली. दुसरीकडे अंडर-ट्वेन्टीथ्री गटात ५४ किलो वजनी गटात भारताच्या निशा हिने जपानच्या कोरिन कोकोफूचा ५-० असा एकतर्फी पराभव करत सुवर्णपदक मिळवलं. या गटात नितिका चंद, काजल, मुस्कान आणि प्रियांका यांना रौप्य पदकं मिळाली.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आज दुसऱ्या उपांत्यफेरीच्या सामन्यात गतविजेता अर्जेंटिना आणि इग्लंड यांच्यात लढत होणार आहे. अमेरिकेतल्या अटलांटा इथं भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडेबाराला हा सामना सुरू होईल.

**<><><><><>**

राष्ट्रीय तपास यंत्रणेद्वारे महाराष्ट्रात तपास केल्या जाणाऱ्या गुन्ह्यांच्या खटल्यांसाठी केंद्रीय गृह मंत्रालयानं एक विशेष न्यायालय स्थापन केलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि राज्य शासन यांच्याशी चर्चा केल्यानंतर मंत्रालयानं हा निर्णय घेतला. या संस्थेद्वारे तपासल्या जाणाऱ्या दहशतवाद आणि इतर अधिसूचित गुन्ह्यांच्या खटल्यांच्या

जलदगती सुनावणीसाठी मुंबई इथल्या शहर दिवाणी आणि सत्र न्यायालयात हे विशेष न्यायालय स्थापन केलं आहे.

//<><><><><>//